# 2. Activity Permission Letter of Grampanchyat, Dhawadi & Principal

॥ पर्यावरण संतुलित समृद्ध गाव ॥

**ग्रामपंचायत धावडी**

ता. वाई जि. सातारा

- सांडपाण्यापासून परसबाग फुलवूया.
- सौरचूल व बायोगॅसचा वापर करुया.
- झाडे लावू, झाडे जगवू.
- शौचालयाचा वापर करुया.
- प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घालूया.
- घनकचऱ्याचे व्यवस्थापन करुया.
- ग्रामपंचायत कराची रक्कम मुदतीत भरु सहकार्य करु.

जा. क्र.:- 

दिनांक :- 9/12/2024

प्रति ,

मा.प्राचार्य
किसनवीर महाविद्यालय,वाई

विषय - मौजे ग्रामपंचायत धावडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर आयोजनाबाबत,

महोदय,

आमचे मौजे ग्रामपंचायत धावडी येथे गेले काही वर्ष राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर झालेले नाही. आमच्या गावाकडून आपल्याला सर्व प्रकारचे सहकार्य मिळेल .तसेच स्वयंसेवकांच्या मुक्कामासाठी व्यवस्था आमच्याकडून करण्यात येईल .

तरी आपण वरिष्ठ महाविद्यालयाचे शिबीर आमच्या गावात घेण्यात यावे, ही विनती. कळावे .

आपली विश्वासू,

Nanaware V.M

सौ.वनिता महेंद्र ननावरे
सरपंच
ग्रामपंचायत धावडी
ता.वाई,जि.सातारा

Allowed
9-12-2024

# 3. Letter of Appreciation

।। पर्यावरण संतुलित समृद्ध गाव ।।

## ग्रामपंचायत धावडी

ता. वाई जि. सातारा

* सांडपाण्यापासून परस बाग फुलवूया.
* सौरचूल व बायोगॅसचा वापर करुया.
* झाडे लावू, झाडे जगवू.
* शौचालयाचा वापर करुया.
* प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घालूया.
* घनकचऱ्याचे व्यवस्थापन करुया.
* ग्रामपंचायत कराची रक्कम मुदतीत भरून सहकार्य करा.

जा. क्र.:- दिनांक :-

## दाखला

प्रति,

मा.प्राचार्य,

किसन वीर महाविदयालय, वाई, जि. सातारा

महोदय,

शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर, जनता शिक्षण संस्थेचे किसन वीर महाविदयालय, वाई चे प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात व डॉ. अंबादास सकट व ग्रामपंचायत धावडी यांच्या संयुक्त विदयमाने दिनाक १८/०१/२०२५ ते २४/०१/२०२५ या कालावधीत श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून सर्व युवक, ग्रामस्थ व स्वंयमसेवक यांच्या श्रमदानातून वनराई बंधारा, स्मशानभूमी स्वच्छता ,ग्रामस्वच्छता, चावडी स्वच्छता, जि.प.प्राथमिक शाळा परिसर स्वच्छता, मुरूम पसरविणे व मुख्यचौकात प्रभात फेरी इत्यादि व प्रबोधनात्मक कार्यक्रम छत्रपती शिवरायांचे न्याय निवाडे, संत गाडगेबाबा :जीवन व कार्य, आधुनिक शेती, निरोगी जीवनाची गुरुकिल्ली, सोशल मीडिया आणि सायबर सेक्युर्टी ,स्वयंमसेवक गट चर्चा, ग्रामसर्व्हेक्षण, आरोग्य शिबीर, ग्रामस्थांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम इ.उपक्रम यशस्वीपणे पार पडले, त्याचे शासकीय मूल्याकन दोन लाख तेहतीस हजार इतके आहे.

कार्यक्रम अधिकारी, डॉ.संग्राम थोरात राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मागणीनुसार सदर दाखला दिला आहे.

Nanaware v. m

सौ.वनिता महेंद्र ननावरे
सरपंच
ग्रामपंचायत धावडी
ता.वाई,जि.सातारा

# 4. Notice

Office,
Kisan Veer Mahavidyalaya, Wai
Date – 15/01/2025

**Notice –**

All Volunteers of the National Service Scheme of Kisan Veer Mahavidyalaya, Wai are hereby informed that NSS Unit is going to organize 'Special Camp' from 18th to 24th January 2025 at Dhawadi Tal.-Wai.

However, all the volunteers should remain present on 18th January 2025 at 09.30 am in front of the main building of the college.

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

Principal

Dr.SangramThorat Dr.AmbadasSakat
Program Officers

Copy –
1. For students to read in class
2. File no. 89A

# 5. Invitation Card



जनता शिक्षण संस्थेचे

किसन वीर महाविद्यालय, वाई

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय सेवा योजना

NOT ME BUT YOU

विशेष श्रमसंस्कार शिबिर

२०२४-२५

स्वच्छ भारत विकसित भारत

शिबिर स्थळ : मौजे धावडी, ता. वाई, जि. सातारा

शिबिर कालावधी

दि. १८ ते २४ जानेवारी २०२५

संपर्क

किसन वीर महाविद्यालय, वाई, (०२१६७) २१९३२६

✻ कार्यक्रम अधिकारी ✻

डॉ. संग्राम थोरात, मो.९६०४०४६०८४

डॉ. अंबादास सकट, मो.७२१९२०३२८४

● आधारस्तंभ ●

मा. मदनदादा भोसले

अध्यक्ष, जनता शिक्षण संस्था, वाई

● सदिच्छा भेट ●

मा. डॉ. तानाजी चौगले

संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मा. प्रो. (डॉ.) नंदकुमार माने

सातारा जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सस्नेह निमंत्रण

सप्रेम नमस्कार, विनंती विशेष...

आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर, "स्वच्छ भारत : विकसित भारत" हे ब्रीदवाक्य घेऊन, धावडी, ता. वाई, जि. सातारा येथे शनिवार दि.१८/०१/२०२५ ते शुक्रवार दि.२४/०१/२०२५ या कालावधीत आयोजित केले आहे, तरी आपण या शिबिरास सदिच्छा भेट द्यावी व शिबिरार्थींना प्रोत्साहन देऊन, मार्गदर्शन करावे, ही विनंती.

आपले नम्र

मा. डॉ. गुरुनाथ फगरे (प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई)

प्रा.डॉ.चंद्रकांत कांबळे (उपप्राचार्य, कला शाखा व रा.से.यो. सल्लागार)

डॉ.राजेश गावीत (सल्लागार, रा.से.यो.)

डॉ.हणमंत कणसे (उपप्राचार्य, विज्ञान शाखा)

श्री.भीमराव पटकुरे (उपप्राचार्य, वाणिज्य शाखा)

डॉ.संग्राम थोरात (कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.)

डॉ.अंबादास सकट (कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.)

समिती सदस्य

कॅप्ट.डॉ.समीर पवार

डॉ.बी.एम.बिराजदार

डॉ.संदीप वाटेगावकर

सौ.एन.ए.भोसले

डॉ.मृणालिणी वाईकर

कु.के.आर.मोरे

सौ.एम.ए.शेवाळे

श्री.जितेंद्र चव्हाण

सौ.वनिता महेंद्र ननावरे (सरपंच, ग्रामपंचायत धावडी)

श्री.अनिल रामराव मांढरे(आप्पा) (उपसरपंच, ग्रामपंचायत धावडी)

श्री.ज्ञानदेव सोपान मांढरे (चेअरमन, विविध कार्यकारी सेवा सोसा.धावडी)

श्री. सुनिल रामराव मांढरे (अध्यक्ष, माहिती अधिकार वाई तालुका)

श्री.त्र्यंबक नानासो मांढरे (माजी वायु सैनिक, धावडी)

श्री.संजय महादेव मांढरे (तंटामुक्ती अध्यक्ष)

श्री.मनोहर शंकर मांढरे (मा.ग्रामपंचायत सदस्य व अध्यक्ष,वनविभाग स.धावडी)

सौ.संगिता विजयकुमार मांढरे (पोलिस पाटील)

श्री.विलास भिकोबा मांढरे (माजी वाई तालुका अध्यक्ष, वाहतुक सेना)

श्री.विजयकुमार बाजीराव मांढरे (माजी संचालक, वाई बाजार समिती)

श्री.सतिश तात्याबा मांढरे (माजी सरपंच, धावडी)

श्री.विष्णू जगन्नाथ मांढरे (मालक वॉल रोप्स प्रा.लि.)

सर्व ग्रामपंचायत कर्मचारी वृंद, धावडी

श्री.चेतन तावरे

श्री.आय.डी.मुलाणी

शनिवार १८ जानेवारी २०२५

दु. ३.०० वा.

● उद्घाटन समारंभ ●

✻ प्रमुख पाहुणे ✻

मा.श्री.रवी बोडके (संस्थापक अध्यक्ष, यशोधन अनाथाश्रम, वेळे)

✻ प्रमुख उपस्थिती ✻

मा.डॉ. जयवंतराव चौधरी (सचिव, जनता शिक्षण संस्था, वाई)

✻ अध्यक्ष ✻

मा.डॉ.गुरुनाथ फगरे (प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई)

● प्रमुख उपस्थिती ●

सौ.वनिता महेंद्र ननावरे (सरपंच, ग्रामपंचायत धावडी) श्री.अनिल रामराव मांढरे(आप्पा) (उपसरपंच, ग्रामपंचायत धावडी)

सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, धावडी

रविवार १९ जानेवारी २०२५ | दुपारी २.३० वा.

व्याख्यान : ॲड. उमेश सणस

विषय : छत्रपती शिवरायांचे न्याय निवाडे

अध्यक्ष : मा.श्री.महेंद्र वामन गंगावणे (सदस्य,ग्रामपंचायत धावडी)

विशेष उपस्थिती : डॉ. राजेश गावीत

सोमवार २० जानेवारी २०२५ | दु. २.३० वा.

व्याख्यान : प्रा. रमेश डुबल

माजी प्र.प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय,वाई

विषय : संत गाडगेबाबा : जीवन व कार्य

अध्यक्ष : मा. श्री.सोमनाथ भानुदास मांढरे

विशेष उपस्थिती : प्रा.डॉ. विनोद वीर

मंगळवार २१ जानेवारी २०२५ | दु. २.३० वा.

व्याख्यान : मा. प्रशांत शेंडे

(तालुका कृषी अधिकारी, वाई)

विषय : आधुनिक शेती

अध्यक्ष : मा.श्री. मिलिंद ज्ञानोबा खंडागळे

विशेष उपस्थिती : प्रा.डॉ. ज्ञानदेव झांबरे

बुधवार २२ जानेवारी २०२५

दु. २.३० वा.

व्याख्यान : मा.डॉ.शेखर कांबळे

(उपाध्यक्ष, वाई अर्बन बँक)

विषय : निरोगी जीवनाची गुरूकिल्ली

अध्यक्ष : मा.सीमा मोहन मांढरे (सदस्य, ग्रामपंचायत,धावडी)

विशेष उपस्थिती : प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे

दुपारी ४.०० वा.

मोफत आरोग्य तपासणी शिबिर

गुरुवार २३ जानेवारी २०२५

दु. २.३० वा.

व्याख्यान : ॲड. राजवर्धिनी भोसले

विषय : सोशल मिडिया आणि सायबर सिक्युरिटी

अध्यक्ष : मा. सौ.दिप्ती सुशांत मांढरे (सदस्य,ग्रामपंचायत धावडी)

विशेष उपस्थिती : डॉ. सौ. मंजुषा इंगवले

रात्री ९.०० वा. सांस्कृतिक कार्यक्रम

शुक्रवार २४ जानेवारी २०२५

सकाळी ११.०० वा.

समारोप समारंभ

प्रमुख पाहुणे - मा.शाम पानेगावकर

पोलिस उपअधिक्षक, पोलिस ठाणे, वाई

विशेष उपस्थिती - मा.केशवराव पाडळे

संचालक, जनता शिक्षण संस्था, वाई

अध्यक्ष - मा. डॉ. गुरुनाथ फगरे

प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय,वाई

प्रमुख उपस्थिती

सौ.वनिता महेंद्र ननावरे (सरपंच, ग्रामपंचायत धावडी) श्री.अनिल रामराव मांढरे(आप्पा) (उपसरपंच, ग्रामपंचायत धावडी)

सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, धावडी

# 6. Flex of camp




## NSS camp 2025 Inauguration Flex



# Day Wise Programs

## Day First
## 18/01/2025
## Inauguration of Camp



जनता शिक्षण संस्था वाई

Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
उद्घाटन समारंभ
कार्यक्रम पत्रिका

शनिवार, १८ जानेवारी २०२५     वेळ-दुपारी ०३:०० वा.

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : डॉ. संग्राम थोरात |
| पाहुण्यांचा परिचय | : कॅप्टन डॉ. समीर पवार |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : मा. रवी बोडके (संस्थापक अध्यक्ष, यशोधन अनाथाश्रम, वेळे) |
| मनोगत | : मा. डॉ. जयवंतराव चौधरी (सचिव, जनता शिक्षण संस्था, वाई) |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. डॉ. गुरुनाथ फगरे (प्राचार्य, किसन वीर महाविद्यालय, वाई) |
| ग्रामस्थांचे मनोगत | : मा. वनिता ननावरे (सरपंच, ग्रामपंचायत, धावडी) |
| | : मा. अनिल मांढरे (उपसरपंच, ग्रामपंचायत, धावडी) |
| | : |
| | : |
| सूत्रसंचालन | : श्रीमती. सुमती कांबळे |
| आभार | : डॉ. अंबादास सकट |

Dr. Sangram Thorat    Dr. Ambadas Sakat    Dr. Gurunath Fagare
Program officers    Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai    Kisan Veer Mahavidyalaya, Wai

**Table Program**




**Hon. Ravi Bodke**



लोकमत

# मी पणा सोडल्यावर समाजसेवा घडते : बोडके

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाई** : राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व समजते. पण, एन. एस. एस. म्हणजे फक्त साफसफाई नसून, सेवेचे व्रत आहे. समाजसेवेसाठी मनाची तीव्र इच्छा हवी, त्यासाठी अहंकार सोडावा लागेल, कारण मी पणा सोडल्यावर समाजसेवा घडते, असे प्रतिपादन वेळे येथील यशोधन अनाथाश्रमाचे अध्यक्ष रवी बोडके यांनी केले.

वाई येथील किसन वीर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.

याप्रसंगी सरपंच वनिता ननावरे, उपसरपंच अनिल मांढरे, उपप्राचार्य डॉ. हणमंतराव कणसे, भीमराव पटकुरे सल्लागार डॉ. राजेश गावित, मनोहर मांढरे, मुख्याध्यापक सुनील शेलार, समर्थ मांढरे, कॅप्टन डॉ. समीर पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, संदीप पातुगडे, रवींद्र जमदाडे, प्रतीक्षा मांढरे, मेघा शिर्के यांची उपस्थिती होती.

सरपंच वनिता ननावरे यांनी शुभेच्छा दिल्या, उपसरपंच अनिल मांढरे म्हणाले, शिबिराच्या निमित्ताने आमच्या गावातून चांगले विचार घेऊन जावे. या गावात तुम्हाला काही कमी पडणार नाही. मनोहर मांढरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे म्हणाले, "आमचे विद्यार्थी गावकऱ्यांच्या सादला प्रतिसाद देतील, निर्हेतुक केलेले काम ही सेवा असते. सेवेला कोणताही मोबदला नसतो. संस्कार शिकायचे आहेत.

Hello Satara
Page No. 2   Mar 12, 2025
Powered by: erelego.com



प्रभात

# मी पणा सोडल्यास समाजसेवा घडते - बोडके

## किसन वीर महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरास धावडी येथे प्रारंभ

वाई, दि. २० (प्रतिनिधी) - राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व समजते; परंतु एनएसएस म्हणजे फक्त साफसफाई नसून, सेवेचे व्रत आहे. त्यासाठी अहंकार सोडावा लागेल. मीपणा सोडल्यावर समाजसेवा घडते, असे मत वेळे येथील यशोधन अनाथाश्रमाचे अध्यक्ष रवी बोडके यांनी व्यक्त केले.

वाई येथील किसन वीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर धावडी येथे सुरू झाले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे अध्यक्षस्थानी होते. सरपंच वनिता ननावरे, उपसरपंच अनिल मांढरे, उपप्राचार्य डॉ. हणमंतराव कणसे, भीमराव पटकुरे, सल्लागार डॉ. राजेश गावित, मनोहर मांढरे, मुख्याध्यापक सुनील शेलार, समर्थ मांढरे, कॅप्टन डॉ. समीर पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, संदीप पातुगडे, रवींद्र जमदाडे, प्रतीक्षा मांढरे, मेघा शिर्के यांची उपस्थिती होती.

धावडी : उद्घाटनप्रसंगी बोलताना रवी बोडके, शेजारी प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे, वनिता ननावरे, अनिल मांढरे व इतर.

बोडके म्हणाले, माणूस यशस्वी होण्यासाठी संघर्ष करावा लागतो. तुमचा हा घडण्याचा काळ आहे. हे स्पर्धात्मक युग आहे. त्यामध्ये स्वतःला सिद्ध करा. एखादा छंद जोपासा. आजकाल कुणाकडेच वेळ नाही. प्रत्येक जण मोबाइलमध्ये व्यग्र आहे. समाजसेवा करताना हे सगळे सोडावे लागते. छोट्या छोट्या गोष्टींनी सेवा साधता येते. मानसिक स्वास्थ्य जपा. समाज चांगला आहे, समाजासाठी जगले पाहिजे.

अनिल मांढरे म्हणाले, शिबिराच्या निमित्ताने आमच्या गावातून चांगले विचार घेऊन जावे. या गावात तुम्हाला काही कमी पडणार नाही.

प्राचार्य डॉ. फगरे म्हणाले, या शिबिरात संस्कार शिकायचे आहेत. गावाची परंपरा समजून घ्या. उत्तम विचार, आचार, उत्तम संस्कार व श्रम देऊन इथले अनुभव व आठवणी घेऊन जाव्या.

मनोहर मांढरे यांनी मनोगत व्यक्त केले. सरपंच वनिता ननावरे यांनी शिबिरार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूमिका वाडकर, कल्याणी जाधव, मुक्ता वाडकर, सिद्धी सावंत, श्रेया शिंदे, सानिका सणस यांनी परिश्रम घेतले. डॉ. संग्राम थोरात यांनी प्रास्ताविक केले. सुमती कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अंबादास सकट यांनी आभार मानले.




**Spectator**

**News Dally Lokmat & Prabhat**

# Day Second
# 19/01/2025



Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
प्रबोधनपर व्याख्यान
'छत्रपती शिवरायांचे न्याय निवाडे'
कार्यक्रम पत्रिका

रविवार, १९ जानेवारी २०२५ वेळ-दुपारी ०२:३० वा.

**********************************************************

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : भूमिका वाडकर |
| पाहुण्यांचा परिचय | : भूमिका घोडके |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : ॲड. उमेश सणस |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. महेंद्र वामन गंगावणे (सदस्य, ग्रामपंचायत, धावडी) |
| विशेष उपस्थिती | : डॉ.राजेश गावित |
| सूत्रसंचालन | : श्रावणी जाधव |
| आभार | : राणी काळे |

Dr. Sangram Thorat Dr. Ambadas Sakat
Program officers
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Dr. Gurunath Fagare
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

## Table Program



## Ad. Umesh Sanas




Volunteer introducing the guests





## Yogasan



प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Satara Edition 22 Jan 2025_007
22 Jan 2025

**धावडी :** शिबिरात बोलताना ॲड. उमेश सणस, शेजारी वनिता ननावरे व इतर.

**छत्रपती शिवाजी महाराज हे न्यायप्रिय राजे होते**

**ॲड. उमेश सणस; श्रमसंस्कार शिबिरात प्रबोधन**

**वाई, दि. २१ (प्रतिनिधी)** - छत्रपती शिवाजी महाराज हे मातृभक्त आणि कर्तव्यनिष्ठ न्यायाधीशही होते. त्यांनी दिलेल्या न्यायनिवाड्यांवरुन ते न्यायप्रिय, जाणते राजे असल्याचे स्पष्ट होते, असे मत शिवचरित्राचे लेखक ॲड. उमेश सणस यांनी केले.

धावडी, ता. वाई येथे सुरु असलेल्या किसन वीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात 'छत्रपती शिवरायांचे न्यायनिवाडे' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच वनिता ननावरे होत्या. ग्रामपंचायत सदस्या दिप्ती मांढरे, ग्रामस्थ पुरुषोत्तम मांढरे, मानसिंग मांढरे, समर्थ मांढरे, प्रणव भिलारे, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, कॅप्टन डॉ. समीर पवार, डॉ. अंबादास सकट, रेखा भोसले, प्रतीक्षा मांढरे, कांचन मोरे उपस्थित होत्या.

ॲड. सणस म्हणाले, शिवरायांच्या अलौकिक कार्यामुळेच त्यांच्यासाठी तानाजी, मुरारबाजी, बाजीप्रभू, शिवा काशीद हे प्राण द्यायला सज्ज झाले. जगाच्या पाठीवर शिवरायांसारखा दुसरा राजा झाला नाही, म्हणूनच चारशे वर्षांनंतरही महाराष्ट्र शिवरायांवर नितांत प्रेम करतो.

वनिता ननावरे यांनी तरुणांना शिवचरित्राचे पारायण करण्याचे आवाहन केले. यावेळी राणी सणस, कल्याणी जाधव, साक्षी नरुटे, अश्विनी गोळे तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## News Dally Prabhat

# Day Third
# 20/01/2025



Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
प्रबोधनपर व्याख्यान
'संत गाडगेबाबा : जीवन व कार्य'
कार्यक्रम पत्रिका

सोमवार, २० जानेवारी २०२५ वेळ-दुपारी ०२:३० वा.

***************************************************************

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : श्वेता शिंदे |
| पाहुण्यांचा परिचय | : दिप्ती महांगडे |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : प्रा.रमेश डुबल (माजी प्र. प्राचार्य, किसान वीर महाविद्यालय, वाई) |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. सोमनाथ भानुदास मांढरे |
| विशेष उपस्थिती | : प्रा.डॉ.विनोद वीर |
| सूत्रसंचालन | : श्रुती पवार |
| आभार | : अंजली शेलार |

Dr. Sangram Thorat Dr. Ambadas Sakat
Program officers
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Dr. Gurunath Fagare
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist. Satara

**Table Program**




**Yogasan**



**Volunteer introducing the guests**



**Prof. Ramesh Dubal**



RPS STAR NEWS

## वाई दि 21 गाडगेबाबा त्यागाचे उत्तम उदाहरण : रमेश डुबल.

वाई राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून सेवा होते. हे सेवेचे व्रत आहे. समाजसेवेसाठी गाडगेबाबांनी आपले आयुष्य वेचले, गाडगेबाबा हे त्यागाचे उत्तम उदाहरण आहे. असे प्रतिपादन रमेश डुबल यांनी केले
येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसर वीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे धावडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात संत गाडगेबाबा: जीवन व कार्य या प्रबोधनपर विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते, धावडी गावचे ग्रामस्थ सोमनाथ मांढरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते याप्रसंगी सरपंच वनिता ननावरे , सदस्य दिप्ती मांढरे, पोलिस पाटील संगीता मांढरे, ग्रामस्थ पुरुषोत्तम मांढरे, महेंद्र गंगावणे, शंतनु मांढरे, समर्थ मांढरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, दीक्षा मोरे, मेघा शिर्के यांची उपस्थिती होती.
डुबल म्हणाले, मानसिक गुलामगिरी घालवण्यासाठी समाजसुधारक लढले, गाडगेबाबांची वृत्ती विचार होती. त्यांना मानवतेची कणव होती. त्यांनी मानवाबरोबर पशुंवरही प्रेम केले. दारिद्र्य, अज्ञान, बुवाबाजीच्या ते विरुद्ध होते. स्वत:ला जिंकल्याशिवाय जग जिंकता येत नाही. गौतम बुद्ध, महात्मा गांधी व गाडगेबाबांनी स्वत:ला जिंकले होते. गाडगेबाबांनी हजारो धर्मशाळा बांधल्या पण शाळेत कधीही गेले नाहीत. अनेक संस्था निर्माण केल्या पण स्वत:च्या घरातील कोणालाही त्या संस्थेवर घेतले नाही. लाखो अन्नछत्र चालवले पण

घरातील कोणालाही त्या संस्थेवर घेतले नाही. लाखो अन्नछत्र चालवले पण स्वत: कधी गोडधोड खाल्ले नाही. देव देवळात नाही तर माणसात आहे हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. प्रेम, हिंमत व त्याग यांचे उत्तम उदाहरण म्हणजे संत गाडगेबाबा. बुद्धांकडे, गांधींकडे आणि गाडगेबाबांकडे अपार सहनशीलता होती. गाडगेबाबा कीर्तनाच्या माध्यमातून कर्मकांड नको म्हणून सांगत होते. पशुहत्या नको, भूतदया करा, मुलांना शाळेत पाठवा, गरिबांना साहाय्य करा. असे विचार ते मांडायचे. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन साधले.
प्रतिक्षा मांढरे यांनीही मनोगत व्यक्त केले.
सोमनाथ मांढरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून तरुणांनी गाडगेबाबांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सायली बांद्रे, पूजा भाणसे, सायली मांढरे, नंदिनी मांढरे, सानिका सणस, दीक्षा चव्हाण, सानिका जाधव, यश कांबळे व संस्कार सोनवणे यांनी परिश्रम घेतले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्वेता शिंदे हीने केले. दीप्ती महांगडे हीने पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रुती पवार हिने सूत्रसंचालन केले तर अंजली शेलार हिने आभार मानले.

**Star News**

# Day Fourth
# 21/01/2025



Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
प्रबोधनपर व्याख्यान
**'आधुनिक शेती'**
कार्यक्रम पत्रिका

मंगळवार, २१ जानेवारी २०२५ वेळ-दुपारी ०२:३० वा.

***************************************************************

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : विजया जगताप |
| पाहुण्यांचा परिचय | : हर्षदा मांडरे |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : मा. प्रशांत शेंडे (तालुका कृषी अधिकारी, वाई) |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. मिलिंद ज्ञानोबा खंडागळे |
| विशेष उपस्थिती | : प्रा.डॉ. ज्ञानदेव झांबरे |
| सूत्रसंचालन | : श्रेया शिंदे |
| आभार | : नम्रता शेलार |

Dr. Sangram Thorat  Dr. Ambadas Sakat
Program officers
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Dr. Gurunath Fagare
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

J.S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

**Table Program**



Volunteers interacting with villagers



**Mr. Prashant Shende**





**Yogasan**



# शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करावी

## प्रशांत शेंडे

केसरी वृत्तसेवा

**जयसिंगपूर:** आपल्यापूर्वजांनी पारंपरिक शेती केली परंतु आज पारंपरिक शेती करून चालणार नाही, आज-काल मजुरांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीकडे वळावे, असे प्रतिपादन वाई तालुक्याचे कृषी अधिकारी प्रशांत शेंडे यांनी केले.

वाई येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसर वीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे धावडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात आधुनिक शेती या प्रबोधनपर विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. धावडी गावचे ग्रामस्थ मिलिंद खंडागळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी सरपंच वनिता ननावरे, डॉ. ज्ञानदेव झांबरे, डॉ. चंद्रकांत कांबळे, डॉ. संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, डॉ. संदीप वाटेगावकर यांची उपस्थिती होती.

शेंडे म्हणाले, भारताची वाढती लोकसंख्या शेतकऱ्यांपुढील उत्पादनाचा मोठा खर्च, शेतीचे तुकडीकरण ह्या शेतकऱ्यांसमोरील समस्या आहेत. आजच्या २१ व्या शतकात रोबोटिक पद्धतीने जर शेती केली तर, उत्पन्नात नक्की वाढ होईल. नवीन तंत्रज्ञानानुसार जमिनीला जेवढे पाणी पाहिजे तेवढे आपण देऊ शकतो. शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धती सोडून आधुनिकतेची कास धरून उन्नती साधावी. राजगिरा, नाचणी, मका बाजरी, हळद यांचे पीक घेऊन त्यापासून पापड, लाडू, लोणचे, लाह्या बणवून माल बाजारात पाठवावा. गोपालन करून बेकरी प्रॉडक्ट तयार करावेत. यामुळे शेतकऱ्यांना उद्योजक म्हणून पुढे आणता येईल. कृषी विभागाला शेतकऱ्यांना उद्योजक बनवायचे आहे. त्यांनी उदाहरणासह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. ज्ञानदेव झांबरे व डॉ. चंद्रकांत कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. मिलिंद खंडागळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून तरुणांना आधुनिक शेती करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक विजया जगताप हीने केले. नम्रता शेलार हिने आभार मानले.

जयसिंगपूर : राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे धावडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलताना प्रशांत शेंडे.

**News Dally Kesari**

# Day Fifth
# 22/01/2025


Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
प्रबोधनपर व्याख्यान
'निरोगी जीवनाची गुरुकिल्ली'
कार्यक्रम पत्रिका
मंगळवार, २२ जानेवारी २०२५ वेळ-दुपारी ०२:३० वा.
**************************************************

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : हर्षल वाडकर |
| पाहुण्यांचा परिचय | : यश कांबळे |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : डॉ. शेखर कांबळे (उपाध्यक्ष, वाई अर्बन बँक) |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. सीमा मोहन मांढरे (सदस्य, ग्रामपंचायत, धावडी) |
| विशेष उपस्थिती | : प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे |
| सूत्रसंचालन | : रोहन भोसले |
| आभार | : विक्रम जगताप |

Dr. Sangram Thorat, Dr. Ambadas Sakat
Program officers
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Dr. Gurunath Fagare
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

**Table Program**



**Dr.Shekhar Kamble**




**Health Checkup**

**सत्य सह्याद्री** www.satyasahyadry.blogspot.com

## ज्याचे मन प्रसन्न तो निरोगी : डॉ. शेखर कांबळे

सत्य सह्याद्री न्यूज नेटवर्क

**वाई :** आपल्या पूर्वजांनी निसर्गाच्या सान्निध्यात राहून चौरस आहार घेतला व ते शतायुषी झाले. आपण मात्र फास्टफूडमध्ये अडकलेले असल्यामुळे तरुणपणीच बीपी, शुगर, ॲटॅकचे प्रमाण वाढलेले आहे. जर पुन्हा आपल्याला शतायुषी व्हायचे असेल तर, मन प्रसन्न ठेवा कारण मन प्रसन्न तो निरोगी, असे प्रतिपादन वाई अर्बन बँकेचे उपाध्यक्ष डॉ. शेखर कांबळे यांनी केले.

धावडी (ता. वाई) येथे किसन वीर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात निरोगी जीवनाची गुरुकिल्ली या प्रबोधनपर विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ग्रामपंचायत सदस्या सीमा मांढरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. याप्रसंगी सरपंच वनिता ननावरे, सदस्य दीप्ती मांढरे, पोलीस पाटील संगीता मांढरे, प्रभारी प्राचार्य डॉ. ज्ञानदेव झांबरे, सल्लागार प्रा. डॉ. चंद्रकांत कांबळे, विलास मांढरे, कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात, अंबादास सकट, डॉ. संदीप वाटेगावकर, सुमंत सावंत, एन. ए. भोसले, एम. ए. शेवाळे, प्रतीक्षा मांढरे यांची उपस्थिती होती.

डॉ. कांबळे म्हणाले, मानवाने आजच्या धकाधकीच्या जीवनातून वेळ काढून, मैदानी खेळ खेळावेत, आहार, विहार व विचार यांच्यावर लक्ष द्यावे. भरपूर पाणी प्यावे व पूर्वजांप्रमाणे चौरस आहार घ्यावा. सर्वांशी सुसंवाद साधावा तसेच सकारात्मक व आनंदी जीवन जगावे. एखादा छंद जोपासावा, आपली जीवनशैली बदलावी. त्यांनी आपल्या भाषणातून आनंदी जीवनाचे वीस मंत्र विद्यार्थ्यांना दिले व स्वत:वर प्रेम करण्याचा संदेश दिला. तसेच निसर्गाच्या सानिध्यात राहून शतायुषी होण्याचा मंत्र दिला व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.


**विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. शेखर कांबळे, व्यासपीठावर वनिता ननावरे, सीमा मांढरे व मान्यवर.**

व्याख्यानानंतर डॉ. शेखर कांबळे, रवींद्र गायकवाड व अनिता शिंदे यांनी ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी केली. सल्लागार डॉ. चंद्रकांत कांबळे म्हणाले, डॉक्टरांच्या हाती आपली जीवनाची दोरी असते. आता काळ धावपळीचा असल्याने स्वत:साठी जगणे महत्त्वाचे आहे. माणसाने मोकळे असावे, चिंतातूर नसावे, सर्वांनी आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

प्राचार्य डॉ. ज्ञानदेव झांबरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपली मानसिकता सबळ करावी. मन प्रकाश किरणांपेक्षा वेगवान असते, मनाला शांत ठेवावे तसेच वैचारिक देव घेव करावी म्हणजे न्यूनगंड गळून पडेल. आपण जुनी जीवन शैली पुन्हा आत्मसात करायला हवी. सीमा मांढरे यांनी तरुणांना निरोगी राहण्यासाठी व्यायाम करण्याचा सल्ला दिला.

हर्षल वाडकर याने प्रास्ताविक केले. यश कांबळे याने पाहुण्यांचा परिचय करून दिला. रोहन भोसले याने सूत्रसंचालन केले. विक्रम जगताप याने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्कार सोनवणे, चिंतामणी भणगे, दिग्विजय कुटे, विशाल चोरट, मयूर करपे, यश खुडे, रितेश सणस, प्राची जगताप, ऐश्वर्या हिरवे, सिद्धी गायकवाड, राहुल निंबाळकर, सृष्टी जोशी, भूमिका पोळ, आरती नायकवडी, इंद्रायणी घाडगे, अमृता चौधरी यांनी परिश्रम घेतले.

**News Dally Sattya Sahyadri**

# Day Sixth
# 23/01/2025


Janata Shikshan Sanstha's
KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI
National Service Scheme (NSS)

विशेष श्रमसंस्कार शिबिर, धावडी (१८ ते २४ जानेवारी २०२५)
प्रबोधनपर व्याख्यान
'सोशल मिडिया आणि सायबर सिक्युरिटी'
कार्यक्रम पत्रिका

रविवार, २३ जानेवारी २०२५ वेळ-दुपारी ०२:३० वा.

**************************************************************

| | |
|---|---|
| प्रास्ताविक | : कु. चौधरी अमृता |
| पाहुण्यांचा परिचय | : कु. महांगडे |
| मान्यवरांचे स्वागत | : |
| प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन | : ॲड. राजवर्धिनी भोसले |
| अध्यक्षीय मनोगत | : मा. दिप्ती सुशांत मांढरे (सदस्य, ग्रामपंचायत, धावडी) |
| विशेष उपस्थिती | : डॉ.मंजुषा इंगवले |
| सूत्रसंचालन | : श्रावणी जाधव |
| आभार | : सृष्टी जोशी |

Dr. Sangram Thorat Dr. Ambadas Sakat
Program officers
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

Dr. Gurunath Fagare
Principal
Kisan Veer Mahavidyalaya, Wai

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

**Table Program**



**Ad. Raivardhini Bhosale**




**Inauguration of the cultural program**





**Yoga**






**Rally**

# Day Seventh
# 24/01/2025
## Validektari (conclusion) of Camp










**Table Program**

**Photos of Validektari**

# सेवेमुळे अहंकार नष्ट होतो : श्याम पानेगावकर

**सातारा न्यूज;**
**वाई :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सेवेचे महत्व समजते. अशा शिबिरातून साफसफाई करतानाच सेवेचे व्रत अंगी बाणवायचे असतात. समाजसेवेसाठी मनाची तीव्र इच्छा असावी लागते व त्यासाठी अहंकारही सोडावा लागतो, कारण सेवेमुळे अहंकार नष्ट होतो असे प्रतिपादन वाई पोलिस स्टेशनचे पोलिस उपअधीक्षक श्याम पानेगावकर यांनी केले.

येथील किसन वीर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या धावडी येथील विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. ज्ञानदेव झांबरे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. संस्थेचे संचालक केशवराव पाडळे यांची विशेष उपस्थिती होती.

याप्रसंगी सरपंच वनिता ननावरे, उपसरपंच अनिल मांढरे, कला विभागाचे उपप्राचार्य व एन. एस. एस. चे सल्लागार प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे, डॉ. राजेश गावित, विलास मांढरे, सुनील मांढरे, अरविंद मांढरे, मुख्याध्यापक सुनील शेलार, सागर मांढरे, प्रसाद शिंदे, समर्थ मांढरे, कॅप्टन डॉ. समीर पवार, कार्यक्रम अधिकारी डॉ संग्राम थोरात, डॉ. अंबादास सकट, डॉ. मृणालिनी वाईकर, प्रतिक्षा मांढरे यांची उपस्थिती होती.

श्याम पानेगावकर म्हणाले, आपला देश तरुणांचा देश आहे व तुम्ही भारताचे भावी शिलेदार आहात. आपला महाराष्ट्र तर नररत्नांची खाण आहे. त्यांचे



पाईक होण्याचा आपण प्रयत्न करूया. आपल्या देशाला व राज्याला मोठी परंपरा आहे. ती डोळ्यासमोर ठेवून जीवन जगताना वेगळी वाट निवडा. कोणत्याही गर्दीचा भाग बनण्यापेक्षा दर्दी बनून जीवन समृद्ध करा. आपले बोलणे, वागणे व बसण्यातूनही संस्कार दिसून येतात. आलेली कोणतीही संधी दवडू नका. आयुष्यात ध्येय ठेवून मार्गक्रमण करत रहा. पालकांनीही आपल्या पाल्यांना संस्काराचे महत्त्व सांगावे.

संस्थेचे संचालक केशवराव पाडळे यांनी शिबिरात चांगले काम केल्याबद्दल स्वयंसेवकांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

उपसरपंच अनिल मांढरे म्हणाले, शिबिरातील एन. एस. एस. च्या स्वयंसेवकांनी गावाच्या मुख्य पाणी पुरवठ्याच्या विहिरीलगत कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधल्याने आमच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. स्वयंसेवकांनी शिबिरातील प्रत्येक दिवसाच्या प्रबोधनपर व्याख्यानातील एक- एक विचार जरी घेतला तरी ते समृद्ध होऊ शकतात.

विलास मांढरे व एन. एस. एस. चे सल्लागार प्रा.डॉ. चंद्रकांत कांबळे यांनीही मनोगत व्यक्त केले. रोहन भोसले व श्रावणी जाधव या शिबिरात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी, शिबिरातील अनुभवाने आम च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाल्याची भावना व्यक्त केली. शिबिरात उत्कृष्ट काम केल्याबद्दल विलास चोरट व राणी सणस यांचा आदर्श स्वयंसेवक म्हणून सत्कार करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. ज्ञानदेव झांबरे म्हणाले, धावडी गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे हे शिबिर यशस्वी झाले. शिबिराच्या निमित्ताने स्वयंसेवकांना संस्कार मिळाले. या संस्काराच्या बळावर ते जीवनात आपली वेगळी वाट निर्माण करतील.

कार्यक्रमास डॉ. शिवाजी कांबळे, डॉ. आनंद घोरपडे, सुमंत सावंत, सुरज यादव, सोमिनाथ सानप, जितेंद्र चव्हाण, अनिकेत पिसाळ यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम अधिकारी डॉ. संग्राम थोरात यांनी प्रास्ताविक केले. कॅप्टन डॉ. समीर पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. सुमती कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम अधिकारी डॉ. अंबादास सकट यांनी आभार मानले. कार्यक्रमास स्वयंसेवक व धावडीचे ग्रामस्थ उपस्थित होते.

**Dally Satara News**

# 7. NSS Volunteers Work at Camp

1. cleaning of the village deity *Bhairavanath* temple






2. cleaning Area of Cemeteries






3. cleaning of Gram Panchayat office (the *chavdi*)





4. cleaning of Main chouk in the village.





## 5. *Vanrai Bandhara*










## 6. *Rally &* cleaning Area of Cemeteries







## 7. cleaning Area of Z.P. Primary School Dhawadi





# 8. Attendance Sheet:
## Including Teachers, Students (Male & Female) Attendance

Janata Shikshan Sanstha's

**KISAN VEER MAHAVIDYALAYA, WAI**

**National Service Scheme**

**********************************************************

1. **Name of the Program** :- Special Camp
2. **Date of the program** : - 18 to 24 January 2025
3. **Time** : - **07 Am to 05 Pm**
4. **Venue** : - **Dhawadi, Tal. Wai**

J.S.SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

**Attendance of the Program: –**

| Sr. No | Name of the Student | Class | Roll No | Signature |
|---|---|---|---|---|
| 01 | Prathamesh Vicky Lokhande | B.com-I | 06 | Prathamesh |
| 02 | Asif Riyaj Shaikh | B.com I | 05 | A.R.Shaikh |
| 03 | Mayur Dayanand Karape | B.COM I | 03 | M.D.Karale |
| 04 | Vishal Vijay Chorat | B.com I | 51 | Chorat |
| 05 | Yash Santosh Khude | B.COM I | 09 | Yashkhude |
| 06 | Aryan Bhanudas Jamdade | –॥– | 07 | A.B.Jamdade |
| 07 | Pisal Sahil Prashant | –॥– | 81 | [illegible] |
| 08 | Chintamani Dattaram Bhange | B.COM-I | 76 | C.D.Bhange |
| 09 | Rutik Anil Narge | B.com-I | 80 | R.A.Narge |
| 10 | Digvijay Deepak Kute | B.Com-I | 68 | [illegible] |
| 11 | Sanskar Satyawan Sonawane | B.com I | | [illegible] |
| 12 | Rohan Dattatray Bhosale | B.com I | 55 | [illegible] |
| 13 | Yash Raghunath Kamble | B.com I | 66 | Kamble |
| 14 | Ayush Kiran Lokhande | B.A.-I | 153 | Ayush |
| 15 | Sumit Yashwant Bhanage | B.A. I | 49 | SBhage |
| 16 | Ankita Balu Shirke | B.Com I | 116 | A.B.Shirke |
| 17 | Mukta Dilip Wadkar | B.Com I | 141 | M.D.Wadkar |
| 18 | Sana Ashpak Bagwan | B.ComI | 180 | S.A.Bagwan |
| 19] | Bhumika Suryakant Pol | B.ComI | 118 | B.S.Pol. |
| 20) | Dhanushri Ankush Bavalekar | B.com I | 115 | D.A.Bavalekar |
| 21) | Wadkar Sayali Arun | B.com-I | 73 | Sayali |

SANSTHA Wai Dist.Satara KISAN VEER MAHAVIDYALAYA

| Sr.No | Name of the Student | Class | Roll No | Signature |
|---|---|---|---|---|
| 22 | Shraddha Shivaji Dhokale. | B.Com-I | 84 | S.S.Dhokale |
| 23 | Shraddha Santosh Kadam | B.Com I | 89 | Kadam |
| 24 | Shruti Ashok Wadkar | B.Com I | 265 | Wadkar |
| 25 | Harshada Somnath landge | B.Com I | 32 | H.landge |
| 26. | Ishwari Mahendra Yadav | B.Com I | 120 | I.Yadav |
| 27. | Vaibhavi Shankar bhosale | B.Com I | 37 | V.S.Bhosale |
| 28. | Vijaya hanumant Jagtap | B.Com I | 181 | V.H.Jagtap. |
| 29 | Vedika Vikas Pol | B.Com I | 36 | V.V.Pol |
| 30 | Sayali Sharad Vare | B.Com I | 38 | S.S.Vare |
| 31 | Dnyaneshwari Makrand Pol | B.Com I | 61 | D.M.Pol |
| 32 | Shreya Chandrakant Shinde | B.Com I | | S.C.Shinde. |
| 33 | Shruti Vikas Pawar | B.Com I | 50 | Shruti |
| 34 | Shinde Shweta Santosh | B.Com I | 53 | S.S.Shinde |
| 35 | Matangade Dipti Dasharath | B.Com.I | 56 | Dipti |
| 36 | Ghadge Indrayani Mohan | B.Com I | 102 | Indrayani. |
| 37 | Shinde Anisha Santosh | B.Com I | 11 | A.S.Shinde |
| 38 | Naikawadi Aarti Mahadev | B.Com I | 108 | A.M.Naikawadi |
| 39 | Nisha Sanjay Bhilare | B.Com I | 105 | Bhilare |
| 40 | Vaishnavi Suresh Darekar | B.Com I | 13 | Darekar. |
| 41 | Amruta Ajit Chaudhari | B.Com I | 12 | Amruta |
| 42 | Siddhi Sanjay Sawant | B.Com I | 64 | Siddhi |
| 43 | Sakshi Anil Yadav | B.A.I | 08 | S.A.Yadav |
| 44 | Samiksha Bajirao Shelar | B.A.I | 63 | Samiksha |
| 45 | Shravani Sandesh Jadhav. | B.A.I. | 16 | S.S.Jadhav. |
| 46 | Swati Sunil Narawade | B.A.I | 162 | S.S.Narawade |
| 47 | Pooja Subhash Bhonse | B.A.I | 28 | P.S.Bhonse |
| 48 | Sakshi Tanaji Shinde | B.A.I | 27 | Shinde |
| 49 | Bhagyashri Malshid Kore | B.Com I | 197 | B.M.Kore |
| 50 | Ashvini Sunil gole | B.A.I | 113 | A.S.gole |
| 51 | Rani Ankush Sanas | B.A I | 45 | [illegible] |
| 52 | Rani Nilesh Kale | B.A.I | 159 | R.N.Kale |

| Sr.No | Name of the Student | Class | Roll No | Signature |
|---|---|---|---|---|
| 53 | Namrata shelar | B.SC I | 27 | Namrata |
| 54 | Bhumika wadkar | B.com I | 284 | B.V.wadkar |
| 55 | kalayni Jadhav | B.comI | 178 | K.S. Jadhav |
| 56 | Vaibhav Rajpure | B.comI | 213 | [illegible] |
| 57 | Anuj ~~Samit~~ Sutar | B. Com-I | 111 | Sutar A.S |
| 58 | Ritesh Sanas | B. Com-I | 126 | Sanas |
| 59 | Bandre Sayali | B.Com-I | 52 | [illegible] |
| 60 | shelar ~~Anpj~~ Anjali | B. com I | 65 | A.Shelar |
| 61) | Jadhav Sanika | BcomI | 198 | S.D.Jadhav |
| 62) | chavan diksha | BcomI | 26 | D.M.chavan |
| 63) | sakshi Anil Narute | B.A.I | 66 | S.A.Narute |
| 64) | shushti Nitin Joshi | B.A-I | 5 | S.N.Joshi |
| 65) | Narawade S.S. | —״— | | S.S.Narawade |
| 66) | Jay Bhilare | B.com-I | 243 | J.A.Bhilare |
| 67) | siddhesh patane | —״— | 254 | [illegible] |
| 68) | Ghodke B.U. | —״— | 260 | B.U.Ghodke |
| 69) | wadkar shivam | —״— | 239 | S.S.Wadkar |
| 70) | Samarth Mahangade | —״— | 210 | [illegible] |
| 71) | Manish Jagtap | B.SC-I | 122 | M.D.Jagtap |
| 72) | Atul Londhe | —״— | 6 | A.S.Londhe |
| 73) | Kadam pradip | B.Com.I | 270 | Kadam |
| 74) | Sanskar Gurav | B.A-I | 99 | [illegible] |
| 75) | Aditi Sonawane | B.Com-I | 97 | [illegible] |
| 76) | Dhotre pratiksha | —״— | 98 | [illegible] |
| 77) | Harshad ombale | —״— | 272 | Harshad |
| 78) | Vighnesh pol | —״— | 201 | V.S.pol |
| 79) | Rupali Kacharе | —״— | 152 | R.B.Kacharе |
| 80) | Tanmay Kharat | —״— | 151 | TSK |
| 81) | pranay Gadhave | —״— | 205 | P.P.Gadhave |
| 82) | Sakshi Bhosale | B.A-II | 47 | S.S.Bhosale |
| 83) | Bodhe Bhagyashri | —״— | 61 | Bodhe |

| Sr.No | Name of the Student | Class | Roll No | Signature |
|---|---|---|---|---|
| 84) | Kiran Rajpure | B.A.I | 36 | R.Rajpure |
| 85) | Bhosale Rohan | B.Com.I | 55 | R.Bhosale |
| 86) | wadkar Bhumika | —11— | 284 | B.V.wadkar |
| 87) | Chavan Archana | —11— | 42 | [illegible] |
| 88) | Gayatri Aswale | —11— | 146 | G.Aswale |
| 89) | Nimbalkar Rahul | —11— | 127 | [illegible] |

| Sr.No | Name of the Teacher | Designation | Signature |
|---|---|---|---|
| 01 | Dr. S.G. Thorat | Asso. prof. | |
| 02 | Dr. A.D. Sakat | — " — | |
| 03 | Miss. Surve N.S | Assistt Prof | |
| 04 | Miss. Bhosale R.H. | Assist Prof. | |
| 05 | Mr. Kamble V.K. | — " — | |
| 06 | Mrs. Kamble Sumati | — " — | |
| 07 | Mrs. Shirke Megha | — " — | |
| 08 | Dr. S.S. Wategaonkar | — " — | |
| 09 | Dr. S.R. Gavit | — " — | |
| 10 | Miss Mandhare P.S. | — " — | |
| 11 | Mrs. N.A. Bhosale | — " — | |
| 12 | Miss. More D.V. | — " — | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| Sr. No | Participants | Male | Female | Total |
|---|---|---|---|---|
| 01 | Students | 32 | 57 | 89 |
| 02 | Teachers | 05 | 07 | 12 |
| | **Total** | 37 | 64 | 101 |

Program Officer
NSS Department, KVM,Wai

J. S. SANSTHA'S KISAN VEER MAHAVIDYALAYA Wai Dist.Satara

Principal
Kisan Veer Mahavidyalay,Wai